मे २००३

# पतसंस्थांची थकबाकी न होण्यासाठी

राज्यातील नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांची थकबाकी न होण्यासाठी काही बाबी व निकष समजुन घेऊन त्याची काटेकोर अंमलबजावणी करणे क्रमप्राप्त आहे. ठेव संकलन, कर्ज वाटप व कर्जवसुली या त्रिसुत्रीच्या आधारावर पतसंस्था काम करीत असतात. त्यासाठी या तिन्हींचेही नियमावली व सुची बनवून त्याची उपविधी व सहकारी कायद्यानुसार अंमलबजावणी केली तर थकबाकी होऊ शकत नाही. हाच अनुभव येईल.

ठेव संकलनासाठी ठेवींचे नियम तयार करणे, व्याजदर ठरविणे, संचालक मंडळाने त्यास मंजूरी देणे, उपविधीप्रमाणे त्यास संस्था नोंदणी अधिकाऱ्याची मंजुरी घेणे आणि त्यानुसार ठेव संकलन करणे हे जर केले तर त्रिसुत्रीतील पहिल्या सुत्राची १०० टक्के अंमलबजावणी झाली हे सिध्द होईल.

ठेव संकलन करीत असताना किंवा झाल्यानंतर ठेवीचा विनियोग ७० टक्के कर्जात व ३० टक्के लिक्विडीटी म्हणून गुंतवणूक केली तर त्रिसुत्रीमधील दुसरा मुद्दा कर्जवाटप याची पहिली भुमिका स्पष्ट झाली. आता ते ७० टक्के कर्जवाटप यासाठी कर्ज मंजूरीची नियमावली व पध्दत, कागदपत्रांची पुर्तता, उपविधीनुसार व सहकारी कायद्यानुसार त्या त्या मर्यादेपर्यंत संचालक मंडळाच्या बैठकीतच कर्ज मंजूर करणे व कर्जाचे वितरण करणेचे अगोदर प्रशासकीय पातळीवर सर्व कागदपत्रांची कर्जदार व जामिनदार यांचेकडून प्रत्यक्ष खात्री करुन घेणे, कर्जदाराची कर्ज परतफेडीसाठी पोस्टडेटेड चेक घेणे व कर्जाचा विनियोग सभासद कर्जदार कसा करणार यावर पूर्ण नियंत्रण संस्थने ठेवणे, एवढे जरी केले तरी वितरण केलेल्या कर्जामध्ये थकबाकी होण्यास अपवादात्मक परिस्थिती शिवाय संभव नाही.किंबहूना वाटलेल्या कर्जाची वसुली १०० टक्के होणार यात बिलकुल संदेह रहात नाही. ठेव संकलनातील ३० टक्के गुंतवणूक उपविधी व सहकारी कायद्याप्रमाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतच करणे आवश्यक आहे. व त्याचे पालनही काटेकोरपणे व्हायला पाहिजे. संस्था नोंदणी अधिकाऱ्याकडून पूर्व परवानगी घेऊन सुध्दा जिल्हा बँकेच्या ऐवजी अन्य ठिकानी गुंतवणूक करणे पतसंस्थांसाठी कदापी हितकारक नाही. आणि ते पतसंस्थेने परवानगी घेऊनही गुंतवणूक करु नये.

एवढे करुनही अपवादात्मक परिस्थितीमध्ये कर्ज थकीत झाले तर थकबाकी वसुल करण्याचे धोरण संचालक मंडळाने प्रथम निश्चित करावयास पाहीजे. व त्याची थकबाकी वसुली करण्यासाठी सर्वांसाठी समान धोरण , कुठल्या वेळेस कुठली कारवाई करायची यासाठी कलम १०१ व ९१ खाली केंव्हा दावा दाखल करावयाचा किंवा त्याअगोदर थकबाकीदार व जामीनदार यांना केंव्हा प्रथम, द्वितीय किंवा अंतीम नोटीस थकबाकी वसुलीसाठी पाठविणे हे निश्चित करणे आवश्यक आहे. त्यामुळे थकबाकी वसुल करण्याचे काम काटेकोरपणे समान न्यायाप्रमाणे ठरलेल्या वेळेस होईल व थकलेले कर्ज निश्चितपणे वसुल होईल. न्यायालयातुन मिळालेले थकबाकीचे निवाडे किंवा त्याअगोदर न्यायालयातील विविध सुनावणीच्या तारखांना नियमितपणे हजर राहून लवकरात लवकर न्यायालयाचा संस्थेच्या बाजूने आदेश मिळविणे हे अंतिम उद्दिष्टात सातत्य असणे आवश्यक आहे.

एकंदरीत सर्व साधारणपणे महाराष्ट्र राज्यातील नागरी / बीगर ग्रामीण सहकारी पतसंस्थांसाठी थकबाकी न

होण्यासाठी प्रथम पासुन दक्षता जर घेतली तर थकबाकीचे पुढील संकट यशस्वीपणे टाळता येईल.

**जयहिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**